# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४. Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539170,172,173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. जे. डी. पाटील** — **Dr. J. D. Patil**
एम.डी. (होम) — M. D. (Hom.)
**संचालक - विद्यार्थी कल्याण** — **Director – Students' Welfare**


*All correspondence be addressed to the Registrar.*

मआविवि/एसडब्ल्यू/जनरल/४३०/१० दि.०५/०५/२०१०

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

**विषय : उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट क्रिडा प्रशिक्षक, उत्कृष्ट विद्यार्थी व उत्कृष्ट खेळाडू पुरस्कारासाठी प्रस्तावाच्या मुदतीत वाढ झाल्याबाबत...**

**संदर्भ : विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/एस.डब्ल्यु/जनरल/३२३/१० दि. ०१/०४/२०१०**

महोदय / महोदया,

विद्यापीठाकडून दरवर्षी उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट क्रिडा प्रशिक्षक, उत्कृष्ट विद्यार्थी व उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार विद्यापीठ वर्धापनदिनी देण्याची परंपरा आहे. **त्याअनुषंगाने यावर्षीच्या सदर पुरस्कारांसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने दि. ३०/०४/२०१० पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. परंतू महाविद्यालयांकडून कमी प्रस्ताव प्राप्त झाल्यामुळे सदर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत वाढविण्यात आली असून सदर प्रस्ताव दि. १५/०५/२०१० पर्यंत स्विकारले जातील.**

महाविद्यालयातील एक शिक्षक, एक क्रिडा प्रशिक्षक, एक विद्यार्थी व एक खेळाडू विद्यार्थी यांचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव शिफारस करुन पाठवावयाचे आहे. उपरोक्त प्रस्तावांसाठी विहीत नमुन्यातील अर्ज / सहपत्रे ( Appendix A, B, C & D ) विद्यापीठाच्या **www.muhsnashik.com** या संकेतस्थळाच्या होमपेजवर **Department → Students' Welfare → Best Teacher, Best Sports Instructor, Best Student and Best Sports Person Awarded – 2009-10** या शिर्षकावर उपलब्ध आहेत.

अधिष्ठाता / प्राचार्यांनी सदर पुरस्कारासाठी पात्र असलेला शिक्षक / विद्यार्थी यांच्याकडून सदर नमुना अर्ज संपूर्ण भरुन घेऊन तसेच आवश्यक त्या साक्षांकित प्रतींसह संबंधीत खातेप्रमुखांच्या व स्वतःच्या सही शिक्क्यानीशी **विद्यापीठास दि. १५/०५/२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा प्रकारे पाठवावेत. तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

आपला,

सही/-
**संचालक - विद्यार्थी कल्याण**

**सोबत :** वरील प्रमाणे.